# प्रकरण – ६ : भारतातील लोकसंख्या



आकृती ६.१ : भारतातील लोकसंख्या

**प्रस्तावना :**

भारत हा विकसनशील देश आहे. देशाच्या आर्थिक विकासाचा दर हा संख्यात्मक व गुणात्मक वृद्धीवर अवलंबून असतो. त्याचे मापन लोकसंख्या, राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न इत्यादींनुसार केले जाते.

लोकसंख्या म्हणजे लोकांची संख्या, जी एका ठराविक कालावधीसाठी एका विशिष्ट भागात वास्तव्य करते. भारताची लोकसंख्या प्रत्येक दहा वर्षांनी दशकाच्या शेवटी मोजली जाते. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी होती. लोकसंख्या वाढीबाबत चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

जागतिक लोकसंख्येच्या एकूण टक्केवारीत भारताची लोकसंख्या १७.५ टक्के इतकी आहे. जागतिक भू-भागात २.४ टक्के इतका वाटा आहे. लोकसंख्येसंबंधीची माहिती ही रजिस्ट्रार जनरल यांचे कार्यालय आणि भारताची जनगणना समिती यांच्यामार्फत संकलित करून प्रकाशित केली जाते.

**तुम्हांला माहीत हवं : लोकसंख्येचे वास्तव**

- तिसऱ्या शतकात कौटिल्याने 'अर्थशास्त्र' ग्रंथामध्ये असे लिहिले आहे की, लोकसंख्या ही राज्याची कर प्रणाली (धोरण) मोजण्यासाठी एक घटक असतो.
- लोकसंख्येची पद्धतशीर गणना १८६५-१८७२ या कालावधीत देशाच्या विविध भागांमध्ये करण्यात आली. भारताची पहिली जनगणना १८७२ मध्ये करण्यात आली.
- ११ जुलै १९८७ ला संपूर्ण जगाची लोकसंख्या ५०० कोटी इतकी होती. ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिवस म्हणून साजरा केला जातो.

**स्त्रोत :** censusindia.gov.in

**स्मरणशक्तीला चालना द्या.**

इ.९ वी व १० वीच्या भूगोल विषयामध्ये भारताच्या लोकसंख्येची जी वैशिष्ट्ये अभ्यासली ती शोधा. (उदा. लिंग गुणोत्तर, लोकसंख्येची घनता, वयोगट नागरीकरण इत्यादी.)

**लोकसंख्या वाढीतील बदल :**

भारताची लोकसंख्या ही आकाराने खूप मोठी आहे. ती वेगाने वाढते आहे. जनगणनेच्या सर्वेक्षणाद्वारे भारताच्या लोकसंख्येचा आकार, रचना व इतर वैशिष्ट्ये दिसून येतात.

खालील तक्ता ६.१ वरून लोकसंख्या वाढीतील बदल लक्षात येतो.

**भारतातील लोकसंख्या वाढ**

| वर्ष | लोकसंख्या (कोटीमध्ये) | सरासरी वार्षिक वृद्धी दर (टक्क्यांमध्ये) |
|---|---|---|
| १९११ | २५.२ | – |
| १९२१ | २५.१ | –०.०३ |
| १९३१ | २७.९ | १.० |
| १९४१ | ३१.९ | १.३ |
| १९५१ | ३६.१ | १.३ |
| १९६१ | ४३.९ | २.० |
| १९७१ | ५४.८ | २.२ |
| १९८१ | ६८.३ | २.२ |
| १९९१ | ८४.६ | २.१ |
| २००१ | १०२.७ | १.९ |
| २०११ | १२१.०२ | १.४ |

**तक्ता क्र. ६.१** **संदर्भ :** भारतातील जनगणना सर्वेक्षण अहवाल

१) **लोकसंख्येतील अत्यल्प घट (१९११-१९२१) :** १९११-१९२१ या कालावधीत स्थिर लोकसंख्येमध्ये २५.२ कोटी वरून २५.१ कोटी इतकी अत्यल्प घट झाली. त्यामुळे तिथे नकारात्मक वृद्धी दर दिसून येतो. याचे प्रमुख कारण म्हणजे साथीचे रोग उदा. कॉलरा, फ्ल्यू, प्लेग, मलेरिया इत्यादी.

२) **महाविभाजन वर्ष :** १९११ ते १९२१ या कालावधीत लोकसंख्या वाढीचा दर नकारात्मक होता. १९२१ नंतर लोकसंख्या सातत्याने वाढत गेली, म्हणून भारताच्या जनगणनेच्या आयुक्तांनी १९२१ हे वर्ष 'महाविभाजनाचे वर्ष' जाहीर केले.

३) **सकारात्मक वृद्धी दर (१९३१-१९४१) :** भारताचा वार्षिक वृद्धी दर जवळपास १ ते १.३% इतका नों-दविण्यात आला.

४) **लोकसंख्येत सुधारीत वाढ (१९५१ च्या पुढे) :** १९५१-१९७१ या काळातील कालावधीवरून लोकसंख्या ३६.१ कोटी ते ५४.८ कोटी इतकी वाढली. स्वातंत्र्यानंतर लोकसंख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

५) **लोकसंख्येचा विस्फोट (१९७१-२००१) :** या कालावधीत भारताने लोकसंख्येचा विस्फोट अनुभवला, कारण या तीन दशकात लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर हा प्रति वर्ष २% हून अधिक होता.

६) **लोकसंख्या वृद्धी दरात घट (२००१-२०११) :** लोकसंख्येच्या वृद्धी दरात घट झाल्याचे दिसून येत आहे कारण ही घट २००१ मध्ये १.९% तर २०११ मध्ये १.४% इतकी आहे. यावरून हा सरासरी वार्षिक वृद्धी दर कमी होताना दिसून येत आहे.

### लोकसंख्या वाढीचे सिद्धांत :

**१) माल्थस्चा लोकसंख्या वाढीचा सिद्धांत :** थॉमस रॉबर्ट माल्थस यांनी १७९८ मध्ये "An Essay on the Principle of Population" आणि १८०३ मध्ये लिहिलेल्या सुधारीत आवृत्तीत काही उपाय सुचविले.

माल्थसच्या सिद्धांतानुसार लोकसंख्या ही भूमितीय गतीने वाढते (२, ४, ८, १६, ३२, ६४ .....) परंतु अन्नधान्याचा पुरवठा हा गणितीय गतीने वाढतो (१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९ ......). यामुळे लोकसंख्या व अन्नपुरवठा यामध्ये असमतोल निर्माण होतो. हा असमतोल उशीरा विवाह, नैतिक संयम यांसारख्या प्रतिबंधक उपायांनी कमी करता येऊ शकतो. माल्थसने सकारात्मक किंवा नैसर्गिक नियंत्रणाची ही संकल्पना सांगितली. नैसर्गिक आपत्तीमुळे ही अतिरिक्त लोकसंख्या कमी होऊ शकते आणि या असमतोलावर नियंत्रण आणता येते. तथापि हे प्रतिबंधात्मक उपाय हे स्त्री व पुरुष या दोघांवर अवलंबून आहेत.

### लोकसंख्या वाढीसंबंधित संकल्पना :

१) **जन्मदर :** जन्मदर म्हणजे एका वर्षात प्रति १००० लोकसंख्येमागे जन्माला आलेल्या बालकांची संख्या होय. यालाच जननदर असेही म्हणतात.

२) **मृत्यूदर :** मृत्यूदर म्हणजे एका वर्षात प्रति १००० लोकसंख्येमागे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या होय. यालाच मर्त्यतादर असेही म्हणतात.

३) **जीवित प्रमाणदर :** जन्मदर व मृत्यूदर यांच्यातील फरक म्हणजे जगण्याचा दर किंवा जीवित प्रमाणदर होय. हा दर लोकसंख्येतील खरी वाढ दर्शविते.

जीवित प्रमाण दर = जन्मदर - मृत्यूदर

**२) लोकसंख्या संक्रमणाचा सिध्दांत :** ए.जे. कोल व इ.एम. हुवर यांनी 'लोकसंख्या वाढ आणि निम्न उत्पन्न देशातील आर्थिक विकास' (१९५८) या पुस्तकात लोकसंख्या संक्रमणाचा सिद्धांत मांडला.

या सिद्धांतानुसार प्रत्येक देश, लोकसंख्या संक्रमणाच्या तीन टप्प्यांमधून जातो. या सिद्धांतामध्ये संक्रमण हे उच्च ते निम्न जन्म आणि मृत्यूदर दाखवतो.

### लोकसंख्या संक्रमणाचे टप्पे :

या सिद्धांतात आर्थिक विकास व लोकसंख्येतील वाढ यांमधील संबंध तीन टप्प्यांमध्ये स्पष्ट केला आहे. या सिद्धांतानुसार, देश आर्थिकदृष्ट्या प्रगत होतो तेव्हा लोकसंख्या तीन टप्प्यांमधून जाते ती खालीलप्रमाणे :

अ) **पहिला टप्पा (लोकसंख्येतील घटता दर) :** हा पूर्व औद्योगिक व प्राचीन टप्पा होता. यात जन्मदर व मृत्यूदर दोन्हीचे प्रमाण जास्त होते. म्हणजेच सर्व

विकसनशील देश या टप्प्यात होते. सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे लोकसंख्येत कमी वृद्धी झाली. उदा. जास्त प्रमाणात निरक्षरता, अंधविश्वास, दारिद्र्य, रूढीवादी, वैद्यकीय सुविधांचा अभाव इत्यादी. १९२१ पूर्वी भारताचा समावेश लोकसंख्या संक्रमण सिद्धांताच्या पहिल्या टप्प्यात होता.

**आ) दुसरा टप्पा (लोकसंख्येतील वाढता दर) :** औद्योगिकरण व आर्थिक विकासाने दुसऱ्या टप्प्याची सुरुवात झाली. आर्थिक विकासामुळे मृत्यूदर झपाट्याने कमी झाला, पण जन्मदर वाढतच राहिला. यामुळे लोकसंख्येचा विस्फोट झाला. भारतासह सर्व विकसनशील देश या दुसऱ्या टप्प्यात होते. भारताची वाटचाल आता तिसऱ्या टप्प्याकडे सुरू झाली आहे.


**इ) तिसरा टप्पा (कमी व स्थिर लोकसंख्या) :** वाढते औद्योगीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा विस्तार व राहणीमानातील बदल यांमुळे आर्थिक विकासाबरोबरच जन्मदर व मृत्यूदरात घट झाली. सर्व विकसित देश या टप्प्यात होते.

लोकसंख्या संक्रमण सिद्धांत खाली दिलेल्या आकृती ६.२ द्वारे स्पष्ट करता येतो.

**भारतातील जन्मदर व मृत्यूदर**

| वर्ष | जन्मदर | मृत्यूदर |
|---|---|---|
| १९०१ | ४९.२ | ४२.६ |
| १९११ | ४८.१ | ४७.२ |
| १९२१ | ४६.३ | ३६.३ |
| १९३१ | ४५.२ | ३१.२ |
| १९४१ | ३९.९ | २७.४ |
| १९५१ | ४१.७ | २२.८ |
| १९६१ | ४१.२ | १९.० |
| १९७१ | ३७.२ | १५.० |
| १९८१ | ३२.५ | १५.० |
| १९९१ | २९.५ | ९.८ |
| २००१ | २८.३ | ९.० |
| २०११ | २०.९७ | ७.४८ |

**तक्ता क्र. ६.२** **संदर्भ** : भारतातील जगणना सर्वेक्षण अहवाल




**आकृती ६.२ : लोकसंख्या संक्रमण**

**हे करून पहा :**
६.२ या तक्त्याच्या आधारे लोकसंख्या संक्रमणाचा सिद्धांत भारतास कशाप्रकारे लागू होतो ते पहा.

**भारतातील लोकसंख्येचा विस्फोट :**




**आकृती ६.३ लोकसंख्या विस्फोट**

**सांगा पाहू :**

आकृती ६.३ चे निरीक्षण करून अनुमान काढा.

लोकसंख्येचा विस्फोट ही एक अशी अवस्था आहे की, लोकसंख्येतील वाढ ही अर्थव्यवस्थेची वृद्धी व विकासापेक्षा वेगाने होते. भारतातील लोकसंख्येचा विस्फोट हा वाढत्या जन्मदरामुळे व घटत्या मृत्यूदरामुळे झाला आहे.

**वाढत्या जन्मदराची कारणे :**

१) **निरक्षरता :** देशात निरक्षरतेचे प्रमाण खूप जास्त आहे. निरक्षर लोकांची लग्न व अपत्य यांच्या बाबतीतील प्रवृत्ती अत्यंत ताठर असते. स्त्रियांच्या निरक्षरतेमुळे जन्मदरात वाढ झाली आहे.

२) **विवाहाची सार्वत्रिकता :** भारतात विवाह म्हणजे धार्मिक व सामाजिक कर्तव्य समजले जाते. शिक्षणाचा विस्तार होऊन सुद्धा लोकांची विवाहाकडे बघण्याची प्रवृत्ती अजूनही बदललेली दिसून येत नाही.

३) **विवाहाचे वय :** भारतामध्ये इतर देशांच्या तुलनेत लग्नाचे सरासरी वय कमी आहे. स्त्रियांसाठी १८ वर्षे व पुरुषांसाठी २१ वर्षे इतके आहे. कमी वयात विवाह केल्याने जन्मदरात जलद गतीने वाढ दिसून येते.

४) **मुलगाच हवा :** अजूनही अनेक भारतीय पालकांचा इच्छित पुत्रसंख्या प्राप्त होईपर्यंत मुले जन्माला घालण्याकडे कल असतो. याला मुलासाठीचे सर्वाधिक प्राधान्य असे म्हणतात (मेटा प्राधान्य).

५) **संयुक्त कुटुंब पद्धती :** कोणा एकावर आर्थिक जबाबदारी नसल्यामुळे एकत्र कुटुंब पद्धतीत जन्मदराचे प्रमाण जास्त असते.

६) **शेतीवरील अवलंबित्व :** भारतीय शेती मनुष्यबळावर आधारित आहे. त्यामुळे कुटुंबातील अपत्यांची संख्या जेवढी जास्त, तेवढी शेतात काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढते असा समज आहे.

७) **दारिद्र्य :** गरीब लोकांचा कल मोठ्या कुटुंबाकडे जास्त असतो. कारण जास्त मुलं म्हणजे अधिक उत्पन्न अशी धारणा असते.

८) **कुटुंब कल्याण कार्यक्रमाविषयीचे अज्ञान –** बहुतांश लोकांना कुटुंब नियोजनाच्या विविध साधनांची माहिती नसते.

**शोधा पाहू :**

वेगवेगळ्या देशातील स्त्री-पुरुषांची कायदेशीर विवाहाची वयोमर्यादा शोधा.

**माहीत करून घ्या :**

- **न्यूनतम लोकसंख्या :** नैसर्गिक संसाधने लोकसंख्या वाढीपेक्षा जास्त आहेत.
- **अधिकतम लोकसंख्या :** लोकसंख्या वाढ नैसर्गिक संसाधनांपेक्षा जास्त आहे.
- **पर्याप्त लोकसंख्या :** लोकसंख्या वाढ व उपलब्ध नैसर्गिक संसाधने समान आहेत.

**मृत्यूदर कमी होण्याची कारणे :**

१) **वैद्यकीय व आरोग्य सुविधांमधील सुधारणा :** वैद्यकीय सोयीसुविधांमध्ये झालेल्या सुधारणांमुळे प्लेग, पटकी, हिवताप, कांजण्या, क्षयरोग इत्यादी साथीच्या रोगांवर नियंत्रण करण्यात आले आहे.

२) **माता मृत्यूदर :** काळानुरूप आरोग्य सुविधेमधील सुधारणांमुळे प्रसूती दरम्यान मृत्यू पावणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी झाले.

३) **बालमृत्यू दरातील घट :** चांगल्या वैद्यकीय सुविधांमुळे बाल मृत्यूदरात घट झाली आहे. बाल मृत्यूदराप्रमाणे १९५१ मध्ये दर हजारी १४६, २००२ मध्ये दर हजारी ६४ आणि २०११ मध्ये दर हजारी ४७ इतके कमी झाले आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने लहान मुलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन बाल मृत्यूदरात घट झाली आहे.

४) **साक्षरतेत झालेली वाढ :** उच्च शिक्षणामुळे साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होवून राहणीमानाचा दर्जा सुधारतो. शिवाय चांगल्याप्रकारे बालसंगोपन करण्यास मदत होते. शिक्षणामुळे लोकांना अंधश्रद्धा व अज्ञानातून बाहेर पडण्यास मदत झाली आहे.

५) **सकस आहार वापर :** शिक्षणामुळे आरोग्य व सकस आहार यांबद्दल जागृती निर्माण झाली आहे. मुलांचे कुपोषण व स्त्रियांच्या अस्वास्थ्यामुळे मृत्यूचे प्रमाण जास्त होते. सकस आहारामुळे मृत्यूदर नियंत्रित झाला आहे. उदा. शालेय माध्यान्ह भोजन योजना.

६) **आपत्ती व्यवस्थापन :** राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (NDMA) २००५ साली स्थापन झाले. त्यामुळे सर्व प्रकारच्या आपत्तींची तीव्रता कमी करण्यास मदत झाल्याने जीवितहानी कमी झाली आहे.

७) **इतर घटक :** शिक्षण, सामाजिक सुधारणा, वाढते शहरीकरण, राहणीमानात झालेली सुधारणा, जनजागृती मोहिम यांमुळे लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाली आहे.

**तुम्हांला माहीत हवे :**

**लोकसंख्या विस्फोटाचे परिणाम**

- भूमीवर येणारा भार
- कृषीवर येणारा भार
- मूलभूत सुविधांवर येणारा ताण
- अन्नातील मागणी व पुरवठा यांमधील असमतोल
- पर्यावरणाच्या समस्या
- सामाजिक समस्या
- कमी राष्ट्रीय उत्पन्न

## लोकसंख्या विस्फोटावर प्रतिबंधात्मक उपाय

लोकसंख्येतील विस्फोट या समस्येवर खालील उपाय सुचविले आहेत.

अ) **आर्थिक उपाय :** आर्थिक उपायांमुळे लोकांच्या राहणीमानाचा दर्जा वाढून लोकसंख्येतील वाढ रोखली जाऊ शकते. त्यातील काही महत्त्वाचे घटक खालील प्रमाणे आहेत.

- औद्योगिक क्षेत्राचा विस्तार
- रोजगाराच्या संधीत वाढ
- दारिद्र्य निर्मूलन
- उत्पन्न व संपत्तीचे समान वाटप

ब) **सामाजिक उपाय :** लोकसंख्येतील विस्फोट ही सामाजिक व आर्थिक समस्या असून निरक्षरता, अंधविश्वास, रूढी, परंपरा, महिलांना देण्यात आलेले निम्न स्थान इत्यादींशी संबंधित आहे. सामाजिक उपाय खालीलप्रमाणे आहेत.

- शिक्षणाचा विस्तार
- महिलांच्या दर्जात सुधारणा
- लग्नाची किमान वयोमर्यादेत वाढ

क) **भारतातील लोकसंख्या धोरण :** भारतातील लोकसंख्येचे धोरण खालील कार्यक्रमांद्वारे राबविले गेले.



आकृती ६.५ : छोटे कुटुंब

१) **कुटुंब नियोजन कार्यक्रम :** जन्मदर कमी करण्याच्या उद्देशाने १९५२ मध्ये हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. कुटुंब नियोजन म्हणजे नियोजित पालकत्व होय. हा एक उपाय असून संतती नियमनाबाबत निर्णय घेऊन पालक होण्याची संधी घेता येते. लोकांमध्ये जागरूकतेचा अभाव, धार्मिक गैरसमज व सरकारचे अस्थिर धोरण यांमुळे कुटुंब नियोजन कार्यक्रम यशस्वी झाला नाही.

२) **कुटुंब कल्याण कार्यक्रम :** १९७९ मध्ये नियोजन कार्यक्रमाचे नामांतरण कुटुंब कल्याण कार्यक्रम असे करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत कुटुंब नियोजनाच्या सेवा, माता-बालक आरोग्य व आहार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

३) **राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, २००० :** NPP -(National Population Policy) - लोकसंख्येच्या गुणवत्तेत वाढ करणे व लोकसंख्या नियंत्रित करणे या उद्देशाने २००० मध्ये राष्ट्रीय लोकसंख्या धोरण अंमलात आणले. या धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) १४ वर्ष वयापर्यंत मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे.

२) दर हजार बालकांमागे बाल मृत्यूदर ३० इतका कमी करणे.

३) प्रसूती दरम्यान १,००,००० माता मृत्यूदर १०० इतका कमी करणे.

४) मुलांसाठी रोगप्रतिबंधक लसीकरणाचे सार्वत्रिकरण करणे.

५) मुलींचे विवाहाचे वय १८ पूर्वीचे नसावे व शक्यतो २० वर्षानंतर विवाह केले जावेत.

६) रोगप्रतिबंध व नियंत्रण करणे.

७) २०४५ पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर स्थिर ठेवणे.

## लोकसंख्या एक मानवी संसाधन

### प्रस्तावना :

लोकसंख्या हा राष्ट्राचा मौलिक स्त्रोत आहे. नैसर्गिक देणगी ही तेव्हाच महत्त्वाची असते, जेव्हा ती लोकांना खऱ्या अर्थाने उपयुक्त ठरते. उत्पादक लोकसंख्येमुळेच ती संसाधन ठरते. म्हणून मानवी संसाधन हे अंतिम स्त्रोत संसाधन ठरले आहे. निरोगी, सुशिक्षित, कुशल व प्रेरणादायी लोकांमुळे आवश्यकतेनुसार त्यांचा विकास करतात.

जागतिक पातळीवर लोकसंख्येच्या वितरणात असमानता आढळते. शैक्षणिक पातळीत वय व लिंग यांबाबत भिन्नता दिसून येते. त्यांची वैशिष्ट्ये देखील सतत बदलत असतात.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत (UNDP) १९९० मध्ये मानव विकासाची संकल्पना मांडली.

मानव विकासात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय निवडीचा विचार केला जातो. तसेच समृद्ध मानवी जीवन ही समाजाची खरी संपत्ती आहे, याचाही विचार केला जातो.

### आर्थिक विकासामध्ये मानवी संसाधनाची भूमिका :

१) आर्थिक विकास अंतिम असून आर्थिक वृद्धीद्वारे तो प्राप्त होतो. त्यामुळे मानवी परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

२) मानवी विकासाचे योगदान समाजातील नागरी अडथळे कमी करणे व राजकीय स्थैर्य आणणे हे आहे.

३) मानवी विकास केवळ उत्पन्नातील निवडी विस्तारणे नसून मानवी विकासाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय हे सर्व पैलू पूर्ण करणे होय.

४) मानवी विकास शैक्षणिक सुविधांमुळे प्राप्त होतो. महिलांमध्ये साक्षरता दर वाढवणे, जन्मदर कमी करणे, बाल मृत्यूदर कमी करणे, लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे याकरिता मानव संसाधन हे विकासाचे योगदान आहे.

५) मानवी संसाधनाच्या विकासामुळे आयुर्मान व साक्षरता दर यामध्ये सुधारणा होते. यामुळे जगण्याचा दर्जा सुधारतो.

६) मानवी विकासामुळे संसाधन, संशोधन व विकास यात मदत होते. शैक्षणिक संस्थांमध्ये विविध संशोधनासाठी प्रेरणा मिळते.

७) मानवी विकासामुळे मानवी उत्पादकता वाढते. उदा. आरोग्य, शिक्षणातील गुंतवणूक इत्यादी.

८) मानवी विकास ही संकल्पना सार्वत्रिक स्वरूपाची आहे. तो कमी विकसित व उच्च विकसित देशांना उपयुक्त ठरतो. थोडक्यात मानवी विकासामुळे पूर्ण समाज बदलतो.

### तुम्हांला माहीत आहे का ?

**लोकसंख्या शिक्षण :** मानवी संसाधन विकासासाठी लोकसंख्या शिक्षण हे अनिवार्य आहे. युनेस्कोच्या मते, याचे ध्येय फक्त लोकसंख्येबद्दल जागरूकता निर्माण करणे नसून लोकसंख्येची काळजी घेण्याबरोबरच संख्यात्मक आणि गुणात्मक विकासक्षम मूल्य आणि दृष्टीकोन हेही आहे. लोकसंख्या शिक्षण आणि शैक्षणिक कार्यक्रमाच्या साहाय्याने कुटुंबातील, समाजातील, राष्ट्रातील आणि जागतिक परिस्थितीत विकासाच्या हेतूने तर्कसंगत आणि जबाबदार वर्तनाच्या स्थितीचा अभ्यास करणे हे आहे.

### तुम्हांला माहीत हवे :

**लोकसंख्या लाभांश :**

लोकसंख्या लाभांश हे भारतातील स्पर्धात्मक फायद्यासाठी आहे. लोकसंख्या लाभांश तेव्हा मिळतात जेव्हा उत्पादक लोकसंख्येचे प्रमाण एकूण लोकसंख्येत जास्त असते. अर्थव्यवस्थेच्या वृद्धीसाठी जास्तीत जास्त लोकांना उत्पादनक्षम बनविणे हे निर्देशित करते.

# स्वाध्याय

## प्र. १. योग्य पर्याय निवडा :

**१) लोकसंख्या संक्रमण सिद्धांतात पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो.**

अ) जन्मदर व मृत्यूदर खूप जास्त
ब) मृत्यूदर झपाट्याने कमी होतो, पण जन्मदर वाढतच राहतो.
क) जन्मदर व मृत्यूदर कमी झालेले असतात.
ड) देश आर्थिकदृष्ट्या प्रगत होतो.

**पर्याय :** १) अ आणि ब    २) अ आणि क
३) अ, ब आणि क    ४) अ, ब, क आणि ड

**२) खालीलपैकी भारतातील लोकसंख्या विस्फोटाचे कारण नाही.**

अ) निरक्षरता    ब) विवाहाची सार्वत्रिकता
क) एकत्र कुटुंबपद्धती    ड) राहणीमानातील सुधारणा

**पर्याय :** १) अ आणि ब    २) क आणि ड
३) अ, ब आणि क    ४) ड

**३) लोकसंख्या विस्फोटावर केल्या जाणाऱ्या प्रतिबंधात्मक उपायांमध्ये यांचा समावेश होतो.**

अ) रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
ब) महिलांचा दर्जा सुधारणे.
क) राष्ट्रीय लोकसंख्या कार्यक्रम
ड) आपत्ती व्यवस्थापन

**पर्याय :** १) ड    २) अ आणि क
३) क आणि ड    ४) अ, ब आणि क

**४) योग्य पर्यायाची जोडी जुळवा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) महाविभाजन वर्ष | अ) २०४५ पर्यंत स्थिर लोकसंख्या |
| २) ए.जे.कोल आणि इ.एम.हुवर | ब) १९२१ |
| ३) सामाजिक उपाय | क) लोकसंख्या वाढ आणि कमी उत्पन्न देशातील आर्थिक विकास |
| ४) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, २००० | ड) शिक्षणाचा विस्तार |

**पर्याय :** १) १-ड, २-क, ३-अ, ४-ब
२) १-ब, २-क, ३-ड, ४-अ
३) १-ब, २-अ, ३-क, ४-ड
४) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

## प्र. २. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :

१) लोकसंख्येतील वाढ ही अर्थिकवृद्धी व विकासापेक्षा वेगवान होते.
२) जन्मदर आणि मृत्यूदर यांच्यातील फरक.
३) लोकसंख्या वाढ व उपलब्ध नैसर्गिक संसाधनांमध्ये समतोल.
४) १९५२ मध्ये जन्मदर कमी करण्याच्या उद्देशाने सुरू केलेला कार्यक्रम.

## प्र. ३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :

१) 'अ' देशात एका वर्षात दरहजारी चाळीस बालके जन्माला आली.
२) मुंबईतील सार्वजनिक वाहतूकसेवेवर लोकसंख्येचा प्रचंड ताण आहे.
३) 'ब' देशात एका वर्षात दरहजारी पंधरा मृत्यू होतात.
४) चीनमध्ये काही काळ 'एक कुटुंब एक बालक' हे धोरण होते.

## प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

१) भारतातील वाढत्या जन्मदराची कारणे स्पष्ट करा.
२) भारतातील कमी मृत्यूदराची कारणे स्पष्ट करा.
३) आर्थिक विकासामध्ये मानवी संसाधनाची भूमिका स्पष्ट करा.

## प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा :

१) भारतात लोकसंख्या विस्फोट झालेला आहे.
२) भारतातील मृत्यूदर वेगाने कमी होत आहे.
३) पर्याप्त लोकसंख्या देशाच्या विकासाला हातभार लावते.
४) आर्थिक विकासात मानवी संसाधनांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.
५) जन्मदर राहणीमानातील बदल झाल्यामुळे कमी झाला.

## प्र. ६. खालील उदाहरणे सोडवा :

१) खालील तक्त्याच्या आधारावर लोकसंख्येचा तिसरा चतुर्थक ($Q_3$) काढा.
२) खालील तक्त्याच्या आधारे लोकसंख्यावाढीचा वक्र काढा.

| वर्ष | लोकसंख्या (कोटीत) |
|---|---|
| १९५१ | ३६.१ |
| १९६१ | ४३.९ |
| १९७१ | ५४.८ |
| १९८१ | ६८.३ |
| १९९१ | ८४.६ |
| २००१ | १०२.७ |
| २०११ | १२१.०२ |

(स्रोत – जनगणना कार्यालय, भारत)

◈◈◈